**!!Rally!!**

**Special Lecture and OPEN Discussion on "Women's Days"**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, विद्यार्थी कल्याण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि पोलीस आयुक्तालय औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने

## ८ मार्च - जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित

# "स्त्री-पुरुष समता एकजुट रॅली"

# आणि

# विशेष व्याख्यान व मुक्तसंवाद

८ मार्च मानवी इतिहासातील प्रेरणादायी दिवस. युगायुगांची गुलामी, विषमता, दुय्यमत्वाच्या चक्रव्युहास भेदणारे स्त्रीवादी पाऊल. या पाऊलवाटेने अनेक स्त्रियांच्या मुक्तीचा, प्रगतीचा मार्ग सुखकर केला. पण अजुनही हा स्त्रीत्वाचा हुंकार जाणीव, आवाज प्रचलित विषमता, दुय्यमत्व, हिंसाचाराला नामशेष करु शकलेले नाही. सुरेखा, प्रियंका, निर्भया, स्वाती...अशा हजारो-लाखो अनामिका पितृसत्ताक चिरेबंदीत गडप केल्या जात आहेत.

एकविसाव्या शतकामध्ये माहिती-तंत्रज्ञानाच्या क्रांतीमध्ये स्त्रीमुक्ती आणि स्त्रीसक्षमीकरणाच्या भरीव परिवर्तनाचे चित्र नक्कीच आशादायी असले तरी परिवर्तनवादी समतावादी विचारलढ्याचे लाभधारक असणाऱ्या आपणा सर्वांचे हे कर्तव्य ठरते की या विचारलढ्याला पुढे नेणारी कडी बनावे.

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समस्त परिवर्तनवादी समतादर्शी विचारलढ्यांचे स्मरण करावे व वर्तमानातील विषमता - आव्हानांना अव्हेरुन त्याविरुद्ध उभे राहण्याचा संकल्प सर्व तरुण विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक, प्राध्यापक व आपणा सर्वांनी करावा या जाणीवेने दि. ८ मार्च २०१६ रोजी "स्त्री-पुरुष समता एकजुट" रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. मोठ्या संख्येने रॅलीचा भाग बनून परिवर्तनवादी स्त्री-पुरुष एकजुटीच्या विचारांचा एल्गार बुलंद करु हे आवाहन.

---

- स. ९.३० वा. :- "स्त्री-पुरुष समता एकजुट" रॅली
  - ➢ मार्ग : पोलीस आयुक्तालय – विद्यापीठ गेट – विद्यापीठ मुख्य सभागृह
- स. १०.३० वा. :- चहा/नाश्ता
- स. ११.०० वा. :- विशेष व्याख्यान

**विषय : भारतीय स्त्रीमुक्ती संघर्ष : इतिहास आणि आव्हाने**

व्याख्याते - प्रा. प्रतिमा परदेशी, आबासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे


अध्यक्ष - प्रो. बी.ए. चोपडे, मा. कुलगुरु

प्रमुख पाहुणे - मा. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, औरंगाबाद


**स्थळ : मुख्य सभागृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**

Stree-Purush Samta Ekjut Rally [March] &
Lecture: Indian women's liberation struggle: History & Challenges [08.03.2016]




डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
जागतिक महिला दिनानिमित्त
विषय : भारतीय स्त्री मुक्ती संघर्ष : इतिहास आणि आव्हाने



# स्त्रीदेहाचे वस्तूकरण थांबवा

## प्रतिमा परदेशी : विद्यापीठात व्याख्यान

2015-16

औरंगाबाद : जागतिकीकरणानंतर



अन्य उपभोग्य वस्तूंप्रमाणे स्त्रीच्या देहाचेही वस्तूकरण करण्यात आले असून, आज तर तिला 'सरोगसी'च्या माध्यमातून विकले जात आहे. स्त्रीदेहाचे वस्तूकरण थांबवावे तरच जागतिक महिला दिन साजरा करणे सार्थक होईल, असे प्रतिपादन स्त्री चळवळीच्या ज्येष्ठ अभ्यासक प्रा. प्रतिमा परदेशी यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला दिनाच्या कार्यक्रमात प्रा. परदेशी यांचे 'भारतीय स्त्रीमुक्ती संघर्ष : इतिहास आणि आव्हाने' या विषयावर व्याख्यान झाले. कुलगुरु डॉ. बी.ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार, उपायुक्त वसंत परदेशी, राहुल श्रीरामे, संदीप आटोळे, नलिनी चोपडे, डॉ. सुहास मोराळे, प्रा. निर्मला जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. परदेशी म्हणाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांचे समान वाटप व्हावे, या हेतूने हिंदू कोड बिल मांडले. दुर्दैवाने हे बिल मंजूर न झाल्याने महिलांना न्याय मिळू शकला नाही.

तथापि, संपत्तीत पत्नीला वाटेकरी करण्याचा कायदा करण्यात आला. अलीकडच्या काळात मात्र 'बेटी बचाव-बेटी पढ़ाव' अशा पोकळ घोषणा दिल्या जातात. महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी इतिहासाची वस्तुनिष्ठपणे फेरमांडणी करणे गरजेचे आहे. अध्यक्षीय समारोपात डॉ. चोपडे म्हणाले, वंशाचा दिवा मुलगाच असतो ही धारणा आता चुकीची असून, विविध क्षेत्रांत मुलींनी भरारी घेऊन कुटुंबाचे नाव मोठे केले आहे. मला दोन्ही मुली असून, त्या कर्तबगार निघतील, असा विश्वास आहे.

### विद्यापीठात अशांतता पसरविणाऱ्यांना इशारा

◆ डॉ. चोपडे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विद्यापीठात शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. गेल्या काही दिवसांत मात्र काही मंडळी जाणीवपूर्वक अशांतता पसरविण्याचे काम करीत आहे. विद्यापीठात गैरवर्तन करणाऱ्यांनी आता हे प्रकार थांबवावे; अन्यथा त्यांना वठणीवर आणावे लागेल, असे यावेळी पोलीस आयुक्त अमितेशकुमार म्हणाले. अशा लोकांची विद्यापीठ प्रशासनाने तात्काळ पोलिसांकडे तक्रार करावी, त्यांचा योग्य तो बंदोबस्त करण्यात येईल, असे अमितेशकुमार म्हणाले. पोलीस आयुक्तांच्या या वक्तव्यावर जोरदार टाळ्या पडल्या.

दै. लोकमत
दि. ९|३|२०१६

-२६

दिव्य मराठी - दिव्य सिटी

औरंगाबाद, बुधवार, ९ मार्च २०१६ | ७

# ...तरच महिला दिन साजरा केल्याचे सार्थक

## विद्यापीठातील कार्यक्रमात प्रा. प्रतिमा परदेशी यांचे प्रतिपादन

औरंगाबाद । प्रतिनिधी

जागतिकीकरणानंतर अन्य उपभोग्य वस्तूंप्रमाणे स्त्रीच्या देहाचेही वस्तूकरण करण्यात आले असून आज तर तिला 'सरोगसी'च्या माध्यमातून विकले जात आहे. स्त्री देहाचे वस्तूकरण थांबवले तरच जागतिक महिला दिन साजरा केल्याचे सार्थक होईल, असे प्रतिपादन स्त्री चळवळीच्या ज्येष्ठ अभ्यासिका प्रा. प्रतिमा परदेशी यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व पोलिस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'भारतीय स्त्री मुक्ती संघर्ष : इतिहास आणि आव्हाने' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे अध्यक्षस्थानी होते. या वेळी पोलिस आयुक्त अमितेशकुमार, उपायुक्त वसंत परदेशी, राहुल श्रीरामे, संदीप आटोळे, नलिनी चोपडे, डॉ. सुहास मोराळे, प्रा. निर्मला जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. प्रतिमा परदेशी म्हणाल्या की, देशातील जातव्यवस्था प्रबळ ठेवण्यासाठी स्त्रियांवर अनिष्ठ रुढी, परंपरांची बंधने घालण्यात आली. सुरुवातीला महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. नंतर शाहू महाराजांनी करवीर संस्थानात कायदा करून स्त्रियांना संरक्षण दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना 'सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा' यांचे समान वाटप व्हावे, या हेतूने 'हिंदू कोड बिल' मांडले. दुर्दैवाने हे बिल मंजूर न झाल्याने महिलांना न्याय मिळू शकला नाही. तथापि, संपत्तीत पत्नीला वाटेकरी करण्याचा कायदा करण्यात आला. अलीकडे 'बेटी बचाव-बेटी पढाव' अशा पोकळ घोषणा दिल्या जातात. महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी इतिहासाची वस्तुनिष्ठपणे फेरमांडणी करणे गरजेचे आहे, असेही प्रा. परदेशी म्हणाल्या. अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे म्हणाले, वंशाचा दिवा मुलगाच असतो ही धारणा आता चुकीची असून विविध क्षेत्रात मुलींनी भरारी घेऊन कुटुंबाचे नाव मोठे केले. डॉ. सुहास मोराळे यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन डॉ. बीना सेंगर तर आभार प्रा. निर्मला जाधव यांनी मानले.

### अशांतता पसरवाल तर वठणीवर आणू

कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विद्यापीठात शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. गेल्या काही दिवसांत मात्र काही मंडळी जाणीवपूर्वक अशांतता पसरविण्याचे काम करीत आहेत. विद्यापीठातील हे गैरवर्तन करणाऱ्यांनी आता हे प्रकार थांबवावे अन्यथा त्यांना वठणीवर आणावे लागेल, असे या वेळी पोलिस आयुक्त अमितेशकुमार म्हणाले. अशा लोकांची विद्यापीठ प्रशासनाने तत्काळ पोलिसांकडे तक्रार करावी, त्यांचा योग्य तो बंदोबस्त करण्यात येईल, असे अमितेशकुमार म्हणाले.

दिव्य मराठी - दिव्य सिटी
दि. 09.03.2016

20

दै. लोकमत दि. 05/03/

## विद्यापीठात एकजूट रॅली

**औरंगाबाद :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे स्त्री अभ्यासकेंद्राच्या वतीने मंगळवारी (दि.८) रोजी सकाळी ९.३० वाजता स्त्री-पुरुष समता एकजूट रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

2015-16




जागतिक महिला दिनानिमित्त मंगळवारील महिला सशक्तीकरण फेरीत सहभागी महिला, युवती.



जागतिक महिला दिनानिमित्त मंगळवारी घेण्यात आलेल्या फेरीत सहभागी शहरवासीय.

# सशक्तीकरणासाठी महिलांची धाव

## महिलादिनी सुरक्षेचा जागर

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. ८ : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शहर पोलिस व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने पाच किलोमीटर धावणे व चालण्याची स्पर्धा घेतली. मंगळवारी (ता. सात) सकाळी सात वाजता पोलिस आयुक्तालयातून निघालेली फेरी पावणेआठच्या सुमारास विद्यापीठात पोहोचली. यानंतर समारोपाचा कार्यक्रम झाला.

शहरातील महिलांचे सक्षमीकरण व्हावे, त्यांच्यात आत्मविश्वास तसेच जागरूकता वाढीस लागावी, यासाठी फेरी घेण्यात आली. महिलांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी, पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



**महिला दिनानिमित्त महिला अधिकाऱ्यांना एक दिवसासाठी ठाण्याचा कारभार सोपवण्यात आला. पदभार घेतल्यानंतर सिटी चौक ठाण्यात कामकाज करताना उपनिरीक्षक वर्षाराणी.**

फेरीत दामिनी, पीसीआर मोबाईल, रुग्णवाहिका तसेच ताराबाई शिंदे स्त्रीअभ्यास केंद्रातील महिलांसह बचतगटातील महिलांनीही सहभाग नोंदवला.

फेरी विद्यापीठात पोचल्यानंतर मुख्य सभागृहात 'भारतीय स्त्रीमुक्ती संघर्ष : इतिहास आणि आव्हाने' याविषयी व्याख्यान झाले. पुण्यातील आबासाहेब जेधे महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या प्राध्यापक प्रतिमा परदेशी यांनी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी पोलिस आयुक्त अमितेशकुमार, कुलगुरू प्रा. बी. ए. चोपडे, उपायुक्त संदीप आटोळे, वसंत परदेशी, राहुल श्रीरामे, अभ्यास केंद्राच्या संचालक निर्मला जाधव यांची उपस्थिती होती.

**मंचावर केवळ पुरुषच**

फेरीला सुरवात होण्यापूर्वी पोलिस आयुक्तालयातील मंचावर केवळ पुरुष अधिकारी उपस्थित होते. त्यांनी हिरवा झेंडा दाखवून फेरीला सुरवात केली; पण महिला दिन असूनही मंचावर एकही महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांना स्थान देण्यात आले नव्हते.

**सुरक्षेसाठी सज्जच**

शहर पोलिस दल महिला सुरक्षेसाठी कटिबद्ध आहे. दामिनी पथक चोवीस तास कार्यरत असून महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी महिला दिनी ठाण्यात महिला प्रमुखांची नियुक्ती केल्याचे पोलिस आयुक्त अमितेशकुमार म्हणाले.

दै. सकाळ - औरंगाबाद दु.
दि. ०९.०३.१६